पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/८/कावि/४०२/२०१३
दिनांक - २८/०३/२०१३

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २/४/२०१३ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २/४/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंप्री चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ५४

दिनांक- २.४.२०१३ वेळ- दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २/४/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक २२/३/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-५१) सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक २६/३/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-५२) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह भोसरी येथील उपहारगृह व बहुउद्देशीय हॉल नमुद केलेप्रमाणे भाडेदराने देणेसाठी सदर नाट्यगृहामधील बहूउद्देशीय हॉलचे मासिक भाडे ठरविणेस व व्यवस्थापकांमार्फत नागरीकांना, संस्थांना भाड्याने देणेस व उपहारगृह कमाल ११ महिन्यासाठी प्रस्तावात नमुद दराने प्रभाग स्तरावर वितरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक २/४/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

| अ. क्र. | तपशिल | क्षेत्र | नगररचना विभागातील भाडेदर प्रति चौ.फुट, प्रतिमहा (मनपा व शासन कराव्यतिरिक्त) | एकूण मासिक भाडेदर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | नाट्यगृहा मधील बहुउद्देशीय हॉल | २९०० चौ. फुट | र.रू.५५/- प्रति चौ.फुट प्रतिमहा | १,५९,५००/- | प्रतिवर्ष १२.५ % भाडे वाढ करणे. |
| २ | नाट्यगृहा मधील उपहारगृह (कॅन्टीन) अ)तळमजला | १७६.४९ चौ.फुट | र.रू.६६/- प्रति चौ.फुट प्रतिमहा | ११,६५०/- | प्रतिवर्ष १२.५ % भाडे वाढ करणे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | उपहारगृह | | | | |
| | ब)१ ला मजला उपहागृह | १७६.४९ चौ.फुट | र.रू.५५/- प्रति चौ.फुट प्रतिमहा | ९,७१०/- | प्रतिवर्ष १२.५ % भाडे वाढ करणे. |

विषय क्रमांक- २) MUHS-PCMC यांचे संयुक्त विद्यमाने सुरू होणा-या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ०२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०३-वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोदन, १०५-विषम चिकित्सा व (०१)(०३)-इतर जमा रकमा (०२१००५४५) प्रमाणे छाननी शुल्क शासनास अदा करणे आवश्यक आहे. त्यानंतरच प्रमाणपत्र मिळणार असल्यामुळे एकूण १५ विषयाकरताचे छाननी शुल्क र.रू. २२,५०,०००/- (र.रू.बावीस लाख पन्नास हजार) देण्यास तसेच सदरचा खर्च MUHS-PCMC P.G. Institute या लेखाशिर्षातून खर्च करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक २/४/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.८/१२-१३ मधील अ.क्र.२६ अन्वये, वाय.सी.एम.एच.येथिल नविन लॉन्ड्री उपकरणांकरिता पॅनेल बसविणेकामी मे.राज कार्पोरेशन (नि.र.रू.१३,९३,४८५/- [र.रू. तेरा लाख त्र्यान्नव हजार चारशे पंच्याऐंशी] पेक्षा ३.६० **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.
(दिनांक २/४/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ४) १)श्री.बी.के.गायकवाड, सहाय्यक अभियंता, स्थापत्य विभाग २)श्री.आर.डी.सुर्यवंशी, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य विभाग या कर्मचा-यांना दिनांक २२/३/२०१३ ते ३०/३/२०१३ या कालावधीत सिंगापूर व सेऊल येथे परदेशामध्ये International Study tour for leaders Programme या अभ्यासदौ-यास पाठविणेस व त्याकरिता होणार खर्च अदा करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक २/४/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ५) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२६/२०१२-१३ मधील अ.क्र.३० अन्वये, प्रभाग क्र.८९ येथील ब्रम्हवृंद कॉलनी व नवीन बाणेर पुलाकडे जाणा-या रस्त्यास सी.डी.वर्क बांधणेकामी मे.शिवकुमार कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४६,६८,५३४/- [र.रू.शेहेचाळीस लाख अडुसष्ट हजार पाचशे चौतीस] पेक्षा १२.९७ **%** कमी) या

ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.४२,६६,१७६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २/४/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ६) आधुनिक मशिनरीच्या सहाय्याने मनपाच्या हद्दीतील बहुमजली अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेचे काम कालमर्यादीत असलेने, तसेच निविदा काढुन काम करणेस पुरेसा अपुरा कालावधी असलेने आणि कामाचे स्वरूप विचारात घेता अनधिकृत बांधकामावर कारवाई करणेसाठी विषयांकीत कामास त्याच दराने (र.रू.२५५/- प्रति चौ.मी.) प्रमाणे सुधारीत र.रू.४९,९८,०००/- इतक्या खर्चास आणि प्रस्तुतचे काम मे.मत्ते अन्ड असोसिएट्स यांचेकडून करून घेण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दिनांक २/४/२०१३ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ७) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२१/२४/२०१२-१३ मधील अ.क्र.२० अन्वये, औंध रावेत रस्ता सुधारणीकरण अंतर्गत (भाग-१) बाधित रस्ते असलेले संरक्षण विभागाचे निवासी गाळे बांधणेकामी मे.आर.टी.सबरवाल (नि.र.रू.६७,८७,९५०/- [र.रू. सदुसष्ट लाख सत्याऐंशी हजार नऊशे पन्नास] पेक्षा ५.५० **%** जास्त) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.७१,६१,२८७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे या अटीसह निविदा दरास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.८/१२-१३ मधील अ.क्र.१५ अन्वये, सन १२-१३ वर्षाकरीता वाय.सी.एम.रूग्णालयामधील विद्युत उपकरणांची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.कुमार इलेक्ट्रिकल अँन्ड ट्रेडिंग कंपणी (नि.र.रू.१८,९६,५९३/- [र.रू.अठरा लाख शहान्नव हजार पाचशे त्र्यान्नव] पेक्षा २०.९९ **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक- ९) | मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.८/१२-१३ मधील अ.क्र. ३७ अन्वये, यशवंतराव चव्हाण रूग्णालय येथिल विद्युत संच मांडणीचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे व ४, ५ व ६ व्या मजल्याचे विद्युतीकरणाचे नुतनीकरण करणेकामी मे.कुमार इलेक्ट्रिकल्स अँन्ड ट्रेडिंग कंपणी (नि.र.रू.१६,७०,५४०/- [र.रू. सोळा लाख सत्तर हजार पाचशे चाळीस] पेक्षा १८.९९ **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे. |
| विषय क्रमांक- १०) | म.रा.वि.वि.कं.यांना चिखली स.नं.१२५३ येथील मैला पंप हाऊस येथे नवीन विजपुरवठाकामी वीजभार मंजुरीपोटी र.रू.२,७१,७३०/- (र.रू.दोन लाख एकाहत्तर हजार सातशे तीस) तातडीने भरणेत आलेने त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे. |
| विषय क्रमांक- ११) | जे.एन.एन.यु.आर.एम.फेज-२ अंतर्गत चिंचवड बिजलीनगर येथील स.नं.१९५ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेत २५.०० ल.लि क्षमतेच्या पाण्याच्या उंच टाकी बांधणेचे काम तांत्रिदृष्ट्या पुर्ण केले असल्याने बिलांच्या अदायगीच्यादृष्टीने वाढीव खर्च र.रू.९,६३,४६२/- (र.रू.नऊ लाख त्रेसष्ट हजार चारशे बासष्ट) प्रस्तावात नमुद प्रमाणे अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे. |
| विषय क्रमांक- १२) | मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१२-१३ मधील अ.क्र.१३५ अन्वये, पिंपरीनगर, अजमेरा मोरवाडी भागात विविध कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणेकामी मे.कुबेरा एंटरप्रायझेस (नि.र.रू.१४,९२,१८८/- [र.रू.चौदा लाख ब्यान्नव हजार एकशे अठ्ठ्याऐंशी] पेक्षा ३.३० **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१५,१५,०९३/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे. |
| विषय क्रमांक- १३) | विविध विभागांची तातडीची मागणी विचारात घेवून, यापुर्वीचे ई.नि.सु.क्र.२१/१-११-१२ अन्वये मंजूर निविदा दराने निविदाकार मे.अमृत मुद्रणालय, चिंचवड यांचेकडून विविध ४० प्रकारचे वाढीव |

खरेदी छपाई साहित्य एकूण र.रू.६,६८,३९८/- (र.रू.सहा लाख अडुसष्ट हजार तीनशे अठ्याऩ्नव) व मे.आशिष एंटरप्रायजेस, चिंचवड यांचेकडून विविध १५ प्रकारचे वाढीव खरेदी छपाई साहित्य एकूण र.रू.४,०५,८५७/- (र.रू.चार लाख पाच हजार आठशे सत्तावन्न) मध्ये खरेदीकामी करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, प्रभाग क्र.९४ किर्तीनगर मधील बॅडमिंटन हॉल व लॉन टेनिस मैदान व इतर परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे कामी मे.राहुल कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१८,६७,४१४/- [र.रू.अठरा लाख सदुसष्ट हजार चारशे चौदा] पेक्षा १९.८० **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१५,७२,५४९/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १५) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२०१२-१३ मधील अ.क्र.९८ अन्वये, थेरगांव प्रभाग क्र.८२ मध्ये गावठान इतर भागात स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेकामी मे.के कमलेश (नि.र.रू.२३,३२,३६०/- [र.रू.तेवीस लाख बत्तीस हजार तीनशे साठ] पेक्षा २०.७१ **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. १९,४१,७९५/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १६) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२०१२-१३ मधील अ.क्र.१०९ अन्वये, वॉर्ड क्र.९५ कवडेनगर येथे ठिकठिकाणी एफ.आर.पी. वाचनालय, मुता-या बसस्टॉप व बेंचेस बसविणेकामी मे.साकळे असोसिएट्स (नि.र.रू.१०,८३,१००/- [र.रू.दहा लाख त्र्याऐंशी हजार शंभर] पेक्षा २३.९९ **%** कमी) या ठेकेदाराकडून

निविदा मंजूर दराने र.रू.८,६४,४२८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १७) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.अमुख्यालय/HO/१०/१ /२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, अ प्रभागातील अतिक्रमण कारवाईसाठी वाहने व इ.सामुग्री पुरविणे (आधुनिक मशिनरीच्या सहाय्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील बहुमजली अनधिकृत बांधकाम पाडणे) कामी मे.मत्ते & असोसिएट्स (२५५ per sqm) हा दर स्वीकृत करून निविदा मंजूर दराने करारनामा करून घेणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.
(नि.र.रू. २५,००,०००/- [र.रू.पंचवीस लाख])

विषय क्रमांक- १८) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१२-१३ मधील अ.क्र.१० अन्वये, वॉर्ड क्र.१० मोशी येथील विकास आराखड्यामधील ताब्यात आलेल्या आरक्षणाच्या कडेने सिमाभिंत बांधणेकामी मे.भगवंत कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१८,६७,३५७/- [र.रू.अठरा लाख सदुसष्ट हजार तीनशे सत्तावन्न] पेक्षा २२.९९ **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१५,०९,९५४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १९) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.२१ अन्वये, वॉर्ड क्र.१२ च-होली येथील निकम वस्तीकडे जाणा-या रस्त्याचे खडीकरण करणेकामी मे.बहिरट ब्रदर्स (नि.र.रू. २४,९९,७८४/- [र.रू.चोविस लाख नव्यान्नव हजार सातशे चौ-यांऐंशी] पेक्षा १८.७८ **%** कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२१,३१,८४१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या

निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २०) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१२-१३ मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.२० करसंकलन इमारतीमध्ये फर्निचरची व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.आर.टी.सबरवाल (नि.र.रू. २४,००,९७८/- [र.रू.चोविस लाख नऊशे अठ्ठ्याहत्तर] पेक्षा १६.४०% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू. २१,०७,५७८/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २१) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.८५ अन्वये, वॉर्ड क्र.१३ येथील उर्वरित नाल्याचे बांधकाम करणेकामी मे.एस.बी.सवई (नि.र.रू.२४,९९,८९४/- [र.रू.चोविस लाख नव्यान्नव हजार आठशे चौ-यान्नव] पेक्षा ११.५० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.२३,२३,०२६/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २२) ई-गव्हर्नन्स प्रकल्पा अंतर्गत विविध संगणक विषयक प्रशिक्षण देणेकामी मनपा अस्थापनेवरील एकूण ५५ कॉम्प्युटर ऑपरेटर कर्मचा-यां करीता प्राप्त दरपत्रकांपैकी मे.सी-डैक अँक्ट, पुणे या संस्थेकडून करारनामा न करता थेट पध्दतीने प्रशिक्षण विषयक कामकाज करून घेणेस व त्याकरीता येणा-या र.रू.४,९५,०००/- (र.रू.चार लाख पंच्यान्नव हजार) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २३) संगणक विभागाचे सन २०१२-१३ चे सुधारित अंदाजपत्रकातील कर्मचारी वेतन व भत्ते या अंतर्गत अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरून र.रू.२०,०००/- स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २४) मनपाच्या आरोग्य विभागाचे वापरासाठी रोड स्विपर मशिन (चॅसिजसह)-०१ नग खरेदीकरणेकरिता प्रसिध्द करणेत आलेल्या नि.नो.क्र.५-१२-१३ भाग-०१ चे कामकाजाकरीता (नि.र.रू. १,०५,००,०००/-) नुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. चिंचवड पुणे-१९. यांचे दर सर्वात कमी असलेने त्यांचेकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या र.रू.९४,५०,०००/- चे खर्चास तसेच सदरचे खरेदी करण्यात आलेले रोड स्विपर मशिनचे चालन व देखभाल दुरुस्ती करणेकरीता प्रसिध्द करणेत आलेल्या नि.नो.क्र.५/१२-१३ भाग-०२ चे कामकाजाकरीता (नि.र.रू.१,८४,३५,०००/-) नुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., चिंचवड, पुणे-१९. यांचे दर सर्वात कमी असलेने भाग-०१ व भाग-०२ मधील कामाचा एकत्रितपणे करारनामा करून घेवून सदर मशीन चालनाकरीता प्रति दिन, प्रति शिफ्टकरीता र.रू.९,२२५/- आणि सदर मशीन देखभाल दुरुस्ती करणेकरीता प्रति महिना र.रू.३४,५००/- याप्रमाणे पाच वर्ष कालावधीसाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्र.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/८/कावि/४०२/२०१३
दिनांक - २८/०३/२०१३

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.